# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.02.2026** **वारः मंगळवार**

---

•राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून महाराष्ट्र, झारखंड आणि राजस्थानच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर
•दहशतवादाच्या प्रतिकारासाठी 'प्रहार' या नवीन धोरणाची सरकारकडून घोषणा.
•नवी दिल्लीत आज निवडणूक आयुक्तांची राष्ट्रीय गोलमेज परिषद
•झारखंडमध्ये विमान कोसळून एअर ॲम्ब्युलन्समधील सात जणांचा मृत्यू
आणि
•टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत वेस्ट इंडिजची झिम्बाब्वेवर १०७ धावांनी मात

**राष्ट्रपतीदौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून महाराष्ट्र, झारखंड आणि राजस्थानच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. मुंबईतील लोकभवन इथं हिंदुजा हॉस्पिटलनं आयोजित केलेल्या 'जीवरक्षण आणि तंदुरुस्त भारताची निर्मिती' या देशव्यापी मोहिमेचं उद्घाटन आज राष्ट्रपतींच्या हस्ते होईल. त्यानंतर उद्या त्या शेगावमध्ये केंद्रीय आयुष मंत्रालयानं आयोजित केलेल्या 'राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याला उपस्थित राहणार आहेत. नागपूरमध्ये ब्रह्माकुमारींनी आयोजित केलेल्या 'एकता आणि विश्वासतून महाराष्ट्राचं सुवर्णयुग उपक्रमाच्या उद्घाटन समारंभलाही त्या उपस्थित राहणार आहेत. गुरुवारी जमशेदपूर मधील श्री जगन्नाथ मंदिराच्या भूमिपूजन समारंभात मुरमू सहभागी होणार आहेत. जमशेदपूर इथल्या मणिपाल टाटा मेडिकल कॉलेजलाही भेट देऊन त्या विद्यार्थ्यांशी संवाद साधतील तर शुक्रवारी, राष्ट्रपती राजस्थानमधील पोखरण इथं भारतीय वायु दलाच्या, वायुशक्ती-2026 या कार्यक्रमाला उपस्थित राहून वायुदलाच्या विविध प्रात्यक्षिकांची त्या पाहणी करणार आहेत.

**पंतप्रधानइस्राइलदौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या इस्राइल भेटीसाठी उद्या रवाना होणार आहेत. पंतप्रधान मोदी यांचा आगामी इस्रायल दौरा ऐतिहासिक ठरेल असा विश्वास इस्रायलमधील भारताचे राजदूत जे. पी. सिंह यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी काल इस्राइलमध्ये जेरूसलेम इथं आकाशवाणीशी संवाद साधला. पंतप्रधान मोदी आपल्या इस्राइल दौऱ्यात इस्राइलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू

यांच्याशी चर्चा करणार आहेत, तसंच इस्रायलचे अध्यक्ष इसाक हर्झोग यांचीही ते भेट घेणार आहेत. या दौऱ्यादरम्यान मोदी इस्रायलच्या संसदेला संबोधित करणार आहेत. याआधी २०१७ मध्ये पंतप्रधान मोदींनी इस्रायलला भेट देऊन नेतन्याहू यांच्यासमवेत द्विपक्षीय चर्चा केली होती. दोन्ही देशांदरम्यान काही महत्त्वाच्या करारांवर स्वाक्षरी होण्याचीही शक्यता असल्याची माहिती जे. पी. सिंह यांनी दिली.

**<u>प्रहार</u>**

वाढत्या दहशतवादी धोक्यांना प्रतिकार करण्यासाठी सरकारनं 'प्रहार' हे नवीन राष्ट्रीय दहशतवाद विरोधी धोरण सुरू केलं आहे. गृह मंत्रालयानं काल याबाबत अधिकृत घोषणा केली. सर्व प्रकारच्या दहशतवादी कृत्यांना गुन्हेगारी ठरवणं, दहशतवाद्यांना, त्यांच्या वित्तपुरवठादारांना, समर्थकांना निधी, शस्त्रे तसंच आश्रयस्थानं मिळण्यास अटकाव घालणं हे या या धोरणाचं उद्दिष्ट आहे. याशिवाय, भविष्यातील दहशतवादी धोक्यांना कमी करण्यासाठी तंत्रज्ञानातील गुंतवणूक आणि खाजगी उद्योगांशी भागीदारी या धोरणात समाविष्ट करण्यात आली आहे. दहशतवाद आणि हिंसाचाराबद्दल सरकारच्या शून्य-सहिष्णुतेच्या दृष्टिकोनाचा पुनरुच्चार प्रहार या धोरणाद्वारे अधोरेखित करण्यात आला आहे.

**<u>निवडणूकआयोग</u>**

नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं आज निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयुक्तांची राष्ट्रीय गोलमेज परिषद आयोजित करण्यात आली आहे . २७ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर ही परिषद होत आहे. याआधी अशी परिषद १९९९ मध्ये आयोजित करण्यात आली होती. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली ही गोलमेज परिषद होणार आहे. निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे राज्य निवडणूक आयुक्त त्यांच्या कायदेशीर आणि तांत्रिक तज्ञांसह सहभागी होतील. याशिवाय, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य निवडणूक अधिकारी देखील परिषदेत सहभागी होतील. निवडणूक प्रक्रिया, निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयुक्तांच्या कामकाजात समन्वय वाढवणं हा या गोलमेज परिषदेचा प्राथमिक उद्देश आहे.

**<u>मोदी-पत्र-एनओए</u>**

पंतप्रधान मोदी यांनी पश्चिम बंगालच्या जनतेला पत्र लिहून त्यांना विकास यात्रेत सामील होण्याचं आवाहन केलं आहे. बंगाली आणि हिंदीमध्ये प्रकाशित झालेल्या या पत्रात पंतप्रधानांनी मतदारांना केलेल्या आवाहनाची रूपरेषा मांडली असून राज्यासाठी भाजपचं विकासाचं स्वप्न

मांडलं आहे. पुढील पिढीचं भविष्य कोणत्या मार्गाने जाईल हे राज्यातील लोकांच्या विचारपूर्वक घेतलेल्या निर्णयावर अवलंबून आहे,असंही या पत्रात नमूद करण्यात आलं आहे.

**<u>वैष्णव-आयबीएम</u>**

आयबीएम कंपनी संपूर्ण भारतात क्वांटम कॉम्प्युटिंग आणि क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये गुंतवणूक करण्याची योजना आखत आहे,असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं आहे. आयबीएम प्रगत सेमीकंडक्टर नोड्समधील त्यांची क्षमता अधिक बळकट करत असून त्यामुळं देशातील युवा पिढीला अधिक संधी निर्माण होतील,असं वैष्णव यांनी समाजमध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>इशारायुरोपचा</u>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकताच सर्व आयातींवर १५ टक्के नवीन जागतिक कर लादल्यानंतर अमेरिकेसोबत केलेले व्यापार करार आता धोक्यात येऊ शकतात असा इशारा युरोपियन महासंघानं दिला आहे. याआधी लागू करण्यात आलेलं जागतिक कर धोरण शुक्रवारी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयानं रद्द केल्यानंतर ट्रम्प यांनी हे पाऊल उचललं. ट्रम्प यांच्या नवीन कर धोरणामुळं बहुतेक युरोपियन महासंघाच्या युनियन निर्यातींवर १५ टक्के कर लादण्यात आला आणि यूकेमधून होणाऱ्या निर्यातीवर १० टक्के कर लादण्यात आला असल्यामुळं युरोपियन महासंघाच्या अधिकाऱ्यांनी व्हाईट हाऊसकडून त्यांच्या संबंधित व्यापार करारांसाठी नवीन कर धोरणांबाबत अधिक स्पष्टता मागितली आहे.

**<u>बांग्लादेश</u>**

बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीनं सरकार स्थापन केल्यानंतर राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी येत्या १२ मार्चला १३ व्या बांगलादेश संसदेचं पहिलं अधिवेशन बोलावलं आहे. बीएनपीकडे दोन तृतीयांश बहुमत आहे तर जमात-ए-इस्लामी मुख्य विरोधी पक्ष म्हणून काम करत आहे. या अधिवेशनात नवीन सभापती निवडले जातील,असं बीएनपीचे प्रवक्ते सलाहुद्दीन अहमद यांनी सांगितलं आहे.

**<u>विधीमंडळ</u>**

महाराष्ट्र राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला काल राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या अभिभाषणानं सुरुवात झाली. या अभिभाषणात राज्यपालांनी राज्य सरकारच्या कामगिरीचा आढावा मांडला. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात काल दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडण्यात आला. विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी

शोकप्रस्ताव मांडला. कर्तृत्ववान, शिस्तप्रिय आणि निश्चयी नेतृत्व असलेल्या अजितदादांच्या निधनामुळे आपण वैयक्तिक मित्र गमावला असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. तर विधान परिषदेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, अजितदादा आणि अन्य दिवंगत नेत्यांच्या निधनाबद्दलचा शोकप्रस्ताव मांडला. अजित पवार यांनी पाहिलेलं विकासाचं स्वप्न पूर्ण करणं, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असा निर्धार शिंदे यांनी व्यक्त केला.

**विमानअपघात**

झारखंडच्या चतरा जिल्ह्यातील सिमरियाजवळ विमान कोसळून एअर ॲम्ब्युलन्समधील सर्व सात जणांचा मृत्यू झाला, असं राज्य सरकारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यानं सांगितलं. या विमानानं रांची विमानतळावरून काल रात्री सव्वा सातच्या सुमारास उड्डाण केल्यानंतर काही वेळातच हा अपघात झाला.हे विमान रांचीहून दिल्लीला जात होतं, विमानातील सर्व सात जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले असून त्यांची ओळख पटली आहे.

**वस्त्रोद्योगमंत्री**

सरकारनं २०३१ पर्यंत १० अब्ज डॉलर्सच्या हातमाग निर्यातीचं उद्दिष्ट ठेवले आहे,असं केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरीराज सिंह यांनी सांगितलं, ते काल नवी दिल्लीत राष्ट्रीय हातमाग विकास महामंडळाच्या ४३ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी सिंह यांनी देशांतर्गत हातमाग उत्पादन सक्षम करण्याच्या आणि स्वदेशी कापडांना पाठिंबा देण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करण्याच्या सरकारच्या दृष्टिकोनाचा पुनरुच्चार केला.

**गोयल-कॅनडा**

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी काल कॅनडाचे आंतरराष्ट्रीय व्यापार मंत्री मनिंदर सिद्धू यांच्याशी भारत-कॅनडा व्यापक आर्थिक भागीदारी कराराशी संबंधित चर्चा पुढे नेण्याबाबत दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधला. या संवादादरम्यान आर्थिक भागीदारीला शाश्वत गती देण्यासाठी दोन्ही बाजूंनी येत्या काही महिन्यांत नियमित प्रतिनिधीमंडळ-स्तरीय भेटींद्वारे व्यावसायिक संबंध मजबूत करण्यावर चर्चा करण्यात आल्याचं, गोयल यांनी समाजमाध्यमावारील संदेशात सांगितलं.

**गोयल-यूके**

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी काल नवी दिल्लीत यूके इंडिया बिझनेस कौन्सिलचे अध्यक्ष रिचर्ड हील्ड आणि सॅल्मन स्कॉटलंडचे मुख्य कार्यकारी अधिकारी तविश स्कॉट यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी भारत-यूके व्यापक आर्थिक आणि व्यापार

कराराच्या अंमलबजावणीमुळे उलगडणाऱ्या नवीन मार्गांवर तसंच सागरी उद्योग आणि सीफूड निर्यातीमध्ये वाढलेल्या सहकार्याबाबत चर्चा केल्याचं गोयल यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>वैष्णव-बूंग</u>**

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल ब्रिटिश अकादमी म्हणजेच बाफ्टा पुरस्कारांमध्ये बाल आणि कुटुंब चित्रपट पुरस्कारानं गौरवण्यात आल्याबद्दल 'बूंग' या मणिपुरी चित्रपटाच्या संपूर्ण चमुचं अभिनंदन केलं आहे. हा पुरस्कार जिंकणारा 'बूंग' हा पहिला भारतीय चित्रपट आहे,असंही वैष्णव यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल रात्री मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सुपर ८ गटाच्या सामन्यात वेस्ट इंडिजनं झिम्बाब्वेचा १०७ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने निर्धारित २० षटकांत ६ गडी गमावून २५४ धावा केल्या. झिम्बाब्वेचा संघ १७ षटकं आणि 4 चेंडूत केवळ १४७ धावा करू शकला. वेस्ट इंडिजचा शिमरॉन हेटमायर सामनावीर ठरला. सुपर एट गटाच्या पुढच्या सामन्यात आज इंग्लंड आणि पाकिस्तानविरुद्ध यांच्यात लढत होणार आहे. श्रीलंकेतल्या पल्लेकेले आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर संध्याकाळी ७ वाजता हा सामना सुरू होईल.

**या बरोबरच हे बातमीपत्र संपलं नमस्कार.**